33 (प)

जा.क्र.कृआ/फला २/करार्डान/२०१७/ /१७ ७९/५

कृषि आयुक्तालय, (फलोत्पादन) महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११००५ दि. जून २०१७.
३ जुलै, २०१७

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक,

------------------ विभाग, (सर्व).

विषय :- **सन २०१७-१८ मध्ये रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम व राष्ट्रीय फलोत्पादन अभियानअंतर्गत क्षेत्र विस्तार कार्यक्रमाकरीता कलमा/रोपांचे वाटप, उचल करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना...**

सन २०१७-१८ या वर्षात रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड व राष्ट्रीय फलोत्पादन अभियान या अंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतावर फळबाग लागवड करण्यात येत आहे. या विविध योजनेअंतर्गत फळबाग लागवड करण्यासाठी आवश्यक असलेली कलमे / रोपे राज्यातील शासकीय रोपवाटिका, कृषि विद्यापीठ रोपवाटिका, कृषि विज्ञान केंद्रांच्या रोपवाटिका व खाजगी पंजीकृत रोपवाटिका यांच्याकडून उपलब्ध करून घ्यावयाची आहेत.त्याकरिता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

सदरच्या कार्यक्रमा अंतर्गत कलमे रोपे उपलब्ध करुन देण्याच्या आवंटनाचे नियोजन विभागस्तरावरुन करण्यात यावे याची कृपया नोंद घ्यावी. त्यादृष्टीने तात्काळ कार्यवाही सुरु करण्यात यावी. वरील योजनेतील उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कलमे-रोपे वाटप कार्यक्रमामध्ये कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत यासाठी सर्व स्तरावरुन दक्षता घेण्यात यावी. कलमा-रोपांचे वाटप वेळेवर व सुरळीतपणे व्हावे या उद्देशाने पुढीलप्रमाणे मूलभूत तत्वे निश्चित करण्यात आली आहेत.

१) प्रथम जिल्हयातील / विभागातील शासकिय / कृषि विद्यापीठाच्या रोपवाटीकांवरुन कलमे/रोपे उचलण्यात यावीत.

२) जिल्हयातील / विभागातील शासकिय / कृषि विदयापीठ रोपवाटीकेवरील कलमे/रोपे संपल्यानंतर इतर जवळचे जिल्हयातील / विभागातील शासकिय / कृषि विदयापीठे रोपवाटिकेवरुन कलमे / रोपे उचलण्यात यावीत.

३) शासकिय / कृषि विदयापीठे रोपवाटिकेवरील कलमे / रोपे संपल्यानंतर स्वतःचे जिल्हयातील / विभागातील कृषि विज्ञान केंद्र व खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरून कलमे / रोपांची उचल करावी.

४) जिल्हयातील / विभागातील खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरील कलमे / रोपे संपल्यानंतर इतर जवळचे जिल्हयातील / विभागातील खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरून कलमे उपलब्ध करुन घेण्यात यावेत.

५) विभागाबाहेरील कलमा / रोपांचे वाटप करताना शासकिय फळरोपवाटिकेवरील कलमा / रोपांचे आवंटनास प्रथम प्राधान्य देण्याचे धोरण कटाक्षाने राबविणे आवश्यक आहे. यास्तव सूचित करण्यात येत की, विभागातील शासकिय रोपवाटिकांवरील कलमे / रोपे शिल्लक राहणार नाहीत याची खात्री केल्यानंतर विभागात कलमा / रोपांची गरज भासल्यास विभागाबाहेरील शासकिय रोपवाटिकांवरील शिल्लक कलमे / रोपांचे आवंटनासाठी आयुक्तालयाकडे विचारणा करावी. विभागाबाहेरील कलमा / रोपांचे वाटप संचालक फलोत्पादन स्तरावरुन करण्यात येईल. राज्यातील शासकिय रोपवाटिकांवरील कलमे / रोपे शिल्लक राहणार नाहीत याची खात्री झाल्यावरच कृषि विद्यापीठांच्या रोपवाटिकांवरील कलमे / रोपांचे आवंटन द्यावे. त्यानंतरच विभागअंतर्गत जिल्हयातील व विभागातील व कृषि विज्ञान केंद्राच्या व खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरुन आवंटन देणेबाबत आयुक्तालयाची परवानगी घ्यावी.

वरील तत्वांचा अवलंब करुन शासकिय व विद्यापीठाच्या रोपा / कलमाबाबत जिल्हा / विभागाचा कलमे / रोपे आवंटन आराखडा तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. केलेल्या कलमे / रोपे आवंटन आराखड्याची एक प्रत आयुक्तालयास सादर करावी. तसेच जिल्हा/विभागात जादा होणाऱ्या कलमांची माहिती तात्काळ आयुक्तालयास देण्यात यावी.

योजनेमध्ये कलमे/रोपे उपलब्ध करुन घेताना काही अधिकारी/कर्मचारी आपले वरिष्ठ कार्यालयाची/आयुक्तालयाची पुर्वपरवानगी न घेता विनाआवंटन, स्वतःचे अधिकारात खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरुन कलमे उचलण्यासाठी परवानापत्र (परमिट) देतात. अशा प्रकरणी परवानापत्र (परमिट) देणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांस जबाबदार धरणेत येऊन प्रशासकीय कारवाई करणेत येईल. तसेच अशा विनाआवंटन उचल केलेल्या कलमा-रोपांच्या देयकांची जबाबदारी परवाना पत्र (परमिट) देणाऱ्या अधिकाऱ्यांची राहील. याची गंभीर नोंद घ्यावी.

कलमे/रोपे वाटपाचे जिल्हा/तालुका स्तरावर नियोजन तयार असतानाही केवळ अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे कलमे/रोपे वाटपाचे परवानापत्र (परमिट) देण्यास विलंब होतो. त्यामुळे वेळेत लागवड होत नाही व लाभार्थी शेतक-यास विनाकारण अडचणीस सामोरे जावे लागते. याबाबत लोकप्रतिनिधीमार्फतही तक्रारी येतात. अशा प्रकरणी तथ्य आढळल्यास संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार विभागीय कृषि सहसंचालक यांना राहतील.

कृषि आयुक्तालयाच्या मान्यतेनंतर खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरुन आवंटन देताना राष्ट्रीय बागवानी बोर्डामार्फत मानांकन मिळालेल्या रोपवाटिकांस प्राधान्य देण्यात यावे. तसेच यासाठी खाजगी पंजीकृत रोपवाटिकेवरुन आवंटन देताना जिल्ह्यातील काही ठराविक खाजगी पंजीकृत रोपवाटिकांचाच विचार न करता, रोगमुक्त कलमे/रोपे उपलब्ध असलेल्या अशा सर्वच खाजगी पंजीकृत रोपवाटिकांवरुन कलमा/रोपांचे समप्रमाणात आवंटन दिले जाईल यादृष्टीने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आवंटन देणेबाबत कार्यवाही करावी. जिल्हा स्तरावरुन खाजगी रोपवाटिकानिहाय देय आवंटन देताना सर्व रोपवाटिकाधारकांना एकत्रित बोलावून सर्वांना समान आवंटन देण्याची कार्यवाही करावी.

फळपिकनिहाय/रोपवाटिकानिहाय उपलब्ध करुन दिलेल्या व उचल केलेल्या कलमा/रोपांचा तपशिल आयुक्तालयास दरमहा ५ तारखेपर्यंत ई-मेलदवारे विनाविलंब पाठवावा. तसेच अंतिम उचल अहवाल लागवड हंगाम संपताच ३० दिवसांचे आत आयुक्तालयास सादर करावा.

कलमे/रोपे परवानापत्रावर (परमिट) स्वाक्षरीचे अधिकार फक्त तालुका कृषि अधिकारी यांनाच राहतील. त्यांनी ते आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना प्रदान करु नयेत. त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. त्यासाठी त्यांनी आवश्यक ती पावती पुस्तके छपाईची व त्यांची नोंद ठेवण्याची कार्यवाही करावी.

विभागातील लागवड करणारे शेतकरी व निरनिराळे लोकप्रतिनिधी तसेच रोपवाटिकाधारक व अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अडचणी व तक्रारी यांचे नियंत्रण करावे.

वरील मार्गदर्शक सुचनेच्या रोपवाटिकानिहाय प्राधान्यक्रमात कोणताही परस्परबदल करण्यात येऊ नये.

सन २०१७-१८ या वर्षाचा कार्यक्रम अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सहकार्याने व समन्वयाने पार पाडावयाचा आहे. एखाद्या आकस्मिक कारणामुळे कलमे/रोपांच्या उपलब्धतेमध्ये बदल होत असल्यास त्याबाबतची माहिती यथाशीघ्र आपले वरिष्ठ कार्यालयास पाठविणे गरजेचे आहे. काही तालुका स्तरावरील व जिल्हास्तरावरील अधिकारी हे त्यांना नेमून दिलेला लक्षांक साध्य करण्यासाठी कलमा/रोपांच्या उपलब्धतेबाबत थेट आयुक्तालयाशी पत्रव्यवहार करतात किंवा संपर्क साधतात. ही बाब योग्य नाही.

या वर्षीच्या कलमा/रोपांचे वाटप कार्यक्रमाबाबत संनियंत्रण तसेच आकस्मिक व निकडीच्या बाबीसाठी कृषि आयुक्तालयात खालीलप्रमाणे कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

३७।५
२३/५

पत्ता : कृषि उपसंचालक ( फळे २)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
दुरध्वनी क्रमांक :- ०२०/ २५५३८३३७
ई मेल पत्ता :- nursery136@rediffmail.com

याप्रमाणे विभागीय व जिल्हा स्तरावर कार्यक्रमाचे अंमलबजावणीसाठी कक्ष स्थापन करणेत यावेत व संबंधित जबाबदार अधिकाऱ्याचे नाव, पदनाम, दुरध्वनी, भ्रमणध्वनी व ई मेल इ. माहिती कृषि आयुक्तालयास त्वरीत कळवावी.

वरील सर्व सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांचे नजरेस आणणेसाठी आपल्या स्तरावरुन त्वरित सूचना निर्गमित कराव्यात व या वर्षीचा रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम यशस्वी करण्यांसाठी असल्या स्तरावरुन उचित कार्यवाही करावी.

संचालक, फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५.

प्रत :-

१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ------------------------ (सर्व).

२) संशोधन संचालक, / प्रमुख, उद्यानविद्या विभाग, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अ) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.

ब) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.

क) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, जिल्हा परभणी.

ड) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, जिल्हा अकोला.

३) मा.आयुक्त कृषि कक्ष, कृषि आयुक्तालय, पुणे-१ यांना माहितीसाठी.

४) कक्ष अधिकारी (१३-अे), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.